ड्रायव्हिंग लायसन्ससाठी अधिवास प्रमाणपत्र बंधनकारक; १ ऑगस्टपासून राज्यात नवा नियम

मुंबई, दि. ७ (प्रतिनिधी) : राज्यातील परिवहन व्यवस्था अधिक सुरक्षित, पारदर्शक आणि शिस्तबद्ध करण्याच्या उद्देशाने महायुती सरकारने महत्त्वाचा निर्णय घेतला असून, १ ऑगस्ट २०२६ पासून वाहन चालविण्याचा परवाना (ड्रायव्हिंग लायसन्स) मिळविण्यासाठी तसेच प्रवासी वाहने चालविणाऱ्या चालकांसाठी अधिवास प्रमाणपत्र (डोमिसाइल सर्टिफिकेट) बंधनकारक करण्यात येणार आहे. राज्याचे परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांनी मंगळवारी विधानसभेत या नव्या नियमाची घोषणा केली. या निर्णयामुळे वाहनचालकांची ओळख आणि कागदपत्रांची पडताळणी अधिक प्रभावी होणार असून, बनावट कागदपत्रांच्या आधारे वाहन चालविणाऱ्या व्यक्तींना आळा बसण्यास मदत होईल, असा विश्वास सरकारने व्यक्त केला आहे.

विधानसभेतील प्रश्नोत्तराच्या तासात आमदार दिलीप लंडे यांनी उपस्थित केलेल्या प्रश्नाला उत्तर देताना सरनाईक यांनी सांगितले की, वाहन परवाना आणि प्रवासी वाहन चालकांच्या नोंदणीसंदर्भातील नव्या नियमावलीचा अंतिम मसुदा तयार करण्यात आला असून तो विधी व न्याय विभागाकडे अंतिम मंजुरीसाठी पाठविण्यात आला आहे. आवश्यक कायदेशीर आणि प्रशासकीय मंजुरी मिळाल्यानंतर १ ऑगस्टपासून संपूर्ण राज्यात या नियमाची अंमलबजावणी करण्यात येईल. नव्या व्यवस्थेनुसार अधिवास प्रमाणपत्र सादर केल्याशिवाय व्यावसायिक अथवा प्रवासी वाहने चालविण्यासाठी आवश्यक असलेला आरटीओ बॅज जारी केला जाणार नाही. त्यामुळे चालकांची ओळख निश्चित करण्याबरोबरच त्यांच्या कागदपत्रांची पडताळणी अधिक काटेकोरपणे करता येणार आहे. सार्वजनिक वाहतुकीतील सुरक्षितता वाढविणे आणि नियमांचे पालन सुनिश्चित करणे हा या निर्णयामागील प्रमुख उद्देश असल्याचे परिवहन विभागाने स्पष्ट केले आहे.

सरनाईक यांनी सांगितले की, राज्यात बेकायदेशीरपणे सुरू असलेल्या बाईक टॅक्सी सेवांविरोधातही सरकारने कठोर भूमिका घेतली आहे. अशा सेवांवर सातत्याने कारवाई सुरू असून, त्याचबरोबर या क्षेत्राला कायदेशीर चौकटीत आणण्यासाठी स्वतंत्र नियामक व्यवस्था विकसित करण्यात येत आहे. या माध्यमातून बाईक टॅक्सी आणि अन्य प्रवासी वाहतूक सेवा अधिक शिस्तबद्ध होतील. तसेच सरकारच्या महसुलात वाढ होण्याबरोबरच स्थानिक युवकांसाठी कायदेशीर रोजगाराच्या नव्या संधीही उपलब्ध होतील, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

परिवहन मंत्री यांनी सामाजिक माध्यमावरील पोस्टद्वारेही या निर्णयामागील भूमिका स्पष्ट केली. राज्यातील बाईक टॅक्सी तसेच चारचाकी व्यावसायिक वाहनचालकांची ओळख निश्चित करण्यासाठी आणि त्यांच्या कागदपत्रांची विश्वासार्ह पडताळणी करण्यासाठी ही प्रणाली लागू केली जात असल्याचे त्यांनी नमूद केले. अधिवास प्रमाणपत्राची सक्ती झाल्यानंतरच संबंधित चालकांना अधिकृत आरटीओ बॅज देण्यात येईल, असे त्यांनी स्पष्ट केले. सरकारच्या मते, या निर्णयामुळे सार्वजनिक वाहतुकीतील सुरक्षेचा स्तर उंचावण्यास मदत होईल. चालकांची माहिती अधिक अचूक स्वरूपात उपलब्ध राहिल्याने प्रवाशांचा विश्वास वाढेल, तसेच नियमांचे उल्लंघन करणाऱ्या आणि बनावट कागदपत्रांचा वापर करणाऱ्या व्यक्तींवर प्रभावी नियंत्रण ठेवणे शक्य होईल.

आळेफाटा बाजारात कांद्याच्या दरात किंचित सुधारणा

शेतकऱ्यांना दिलासा, मात्र अपेक्षित भाव अद्याप दूर

आळेफाटा, दि. ७ (वार्ताहर) : आळेफाटा कृषी उत्पन्न बाजार समितीच्या दुय्यम बाजार आवारात मंगळवारी झालेल्या कांदा लिलावात दरात किंचित सुधारणा झाल्याने शेतकऱ्यांना काहीसा दिलासा मिळाला आहे. मागील लिलावाच्या तुलनेत भावात वाढ झाल्याचे चित्र दिसून आले असले, तरी उत्पादन खर्च, वाहतूक आणि मजुरीवरील वाढत्या खर्चाच्या तुलनेत सध्याचे दर अद्याप समाधानकारक नसल्याची भावना शेतकऱ्यांनी व्यक्त केली.

आजच्या लिलावात एकूण ११ हजार ६१३ गोण्या, म्हणजेच ५ हजार ८०६ क्विंटल कांद्याची आवक झाली. मोठ्या प्रमाणातील आवकेनंतरही दरात झालेली किरकोळ सुधारणा ही बाजारासाठी सकारात्मक बाब मानली जात आहे. बाजार समितीचे सभापती संजय काळे, उपसभापती निवृत्ती काळे आणि सचिव रुपेश कवडे यांनी ही माहिती दिली.लिलावात गोळा कांद्याला प्रति १० किलो २८० ते ३२१ रुपये दर मिळाला. सुपर कांद्याचा भाव २६० ते २९० रुपये राहिला. गोल्टी व गोल्टा कांद्याला २३० ते २६० रुपये दर मिळाला, तर बदला अथवा चींगळी कांद्याला ९० ते १४५ रुपये असा भाव मिळाल्याचे बाजार समितीने स्पष्ट केले.

गेल्या काही लिलावांमध्ये कांद्याच्या दरात घसरण झाल्याने शेतकरी चिंतेत होते. अशा परिस्थितीत मंगळवारच्या लिलावात दरात झालेली वाढ दिलासादायक असली, तरी शेतीमालाच्या उत्पादनासाठी लागणारा खर्च आणि वाढलेले वाहतूक दर लक्षात घेता सध्याचे भाव परवडणारे नसल्याचे शेतकऱ्यांचे म्हणणे आहे. त्यामुळे येत्या काही दिवसांत मागणी वाढून कांद्याच्या दरात आणखी सुधारणा होईल, अशी अपेक्षा शेतकरी व्यक्त करीत आहेत. आळेफाटा बाजार समितीत दर मंगळवार, शुक्रवार आणि रविवार सकाळी १० वाजल्यापासून कांद्याचे लिलाव आयोजित केले जातात. जुन्नर तालुक्यासह परिसरातील अनेक गावांतील शेतकरी या बाजारात कांदा विक्रीसाठी आणत असतात. त्यामुळे या बाजारातील दरांचा परिणाम मोठ्या प्रमाणावर स्थानिक कांदा उत्पादकांवर होत असतो, अशी माहिती संचालक प्रीतम काळे आणि व्यवस्थापक सतीश मस्करे यांनी दिली.

मैदानात साचलेल्या पाण्यात बुडून १३ वर्षीय मुलाचा मृत्यू

नालासोपारा, दि. ७ (वार्ताहर) : नालासोपारा पूर्वेतील वलईपाडा परिसरात पावसामुळे मैदानात साचलेल्या पाण्यात पोहण्यासाठी उतरलेल्या १३ वर्षीय मुलाचा बुडून दुर्दैवी मृत्यू झाल्याची घटना सोमवारी दुपारी घडली. पाण्याखाली असलेल्या खोल खड्ड्याचा अंदाज न आल्याने ही दुर्घटना घडल्याची माहिती पोलिसांनी दिली. या घटनेमुळे परिसरात हळहळ व्यक्त होत आहे. पेल्हार पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, गरळपाडा येथील जयअंबे चाळीत राहणारा नमन केसरवाणी हा शाळेला सुट्टी असल्याने सोमवारी दुपारी सुमारे अडीच वाजता आपल्या पाच मित्रांसह वलईपाडा येथील मोकळ्या मैदानात गेला होता. मुसळधार पावसामुळे मैदानात मोठ्या प्रमाणात पाणी साचून त्याचे जलाशयात रूपांतर झाले होते. पोहत असताना नमनचा अचानक तोल जाऊन तो खोल पाण्यात बुडाला. मित्रांनी त्याचा शोध घेण्याचा प्रयत्न केला; मात्र तो दिसून न आल्याने त्यांनी तातडीने स्थानिक नागरिकांना याची माहिती दिली.

३५ कोटींच्या अंबरनाथ पालिका इमारतीच्या सुरक्षेवर प्रश्नचिन्ह

अग्निशमन 'एनओसी', पूर्णत्वाचा दाखला अद्याप प्रलंबित

अंबरनाथ, दि. ६ (वार्ताहर) : सुमारे ३५ कोटी रुपये खर्चून उभारण्यात आलेल्या अंबरनाथ नगरपरिषदेच्या नवीन प्रशासकीय इमारतीच्या सुरक्षेचा आणि कायदेशीर वैधतेचा मुद्दा पुन्हा ऐरणीवर आला आहे. इमारत तांत्रिकदृष्ट्या असुरक्षित असल्याचा आरोप शिवसेनेचे ज्येष्ठ नगरसेवक राजेंद्र वाळेकर यांनी नगरपरिषदेच्या सर्वसाधारण सभेत केला. विशेष म्हणजे, या इमारतीला अद्याप अग्निशमन विभागाचा 'ना हरकत दाखला' (एनओसी) आणि 'पूर्णत्वाचा दाखला' (कम्प्लिशन सर्टिफिकेट) मिळालेला नसल्याची बाबही यावेळी समोर आली.

सर्वसाधारण सभेत वाळेकर यांनी इमारतीतील अग्निसुरक्षा व्यवस्था आणि आपत्कालीन यंत्रणेवर गंभीर प्रश्न उपस्थित केले. "उद्या इमारतीत आग किंवा अन्य आपत्कालीन परिस्थिती निर्माण झाल्यास अधिकारी, कर्मचारी आणि नागरिकांची सुरक्षितता कशी सुनिश्चित केली जाणार?" असा सवाल त्यांनी उपस्थित केला. सुरुवातीला सार्वजनिक बांधकाम विभाग आणि अग्निशमन विभागाच्या अधिकाऱ्यांनी समाधानकारक उत्तर देण्याचे टाळले. मात्र, पुढील चर्चेदरम्यान अंतिम परवानग्या मिळण्यासाठी आवश्यक असलेल्या अनेक तांत्रिक आणि कायदेशीर बाबींची पूर्तता अद्याप झालेली नसल्याचे अधिकाऱ्यांनी मान्य केले.

यापूर्वीही या इमारतीत अनेक ठिकाणी प्लास्टर कोसळणे, पावसाळ्यात गळती होणे अशा त्रुटी समोर आल्या आहेत. तसेच, सभागृहातील पत्रकार कक्षाची रचनाही त्रुटीपूर्ण असल्याची बाब निदर्शनास आली. पत्रकारांसाठी असलेल्या आसनव्यवस्थेतून सभागृहातील कामकाज स्पष्टपणे दिसत नसल्याने बातमी संकलनासाठी त्यांना संपूर्ण वेळ उभे राहावे लागत असल्याची तक्रार करण्यात आली. या संपूर्ण प्रकरणाची गंभीर दखल घेत मुख्याधिकारी उमाकांत गायकवाड यांनी सभागृहातच सार्वजनिक बांधकाम विभाग आणि अग्निशमन विभागाच्या अधिकाऱ्यांना तातडीने सर्व त्रुटी दूर करण्याचे निर्देश दिले. इमारतीतील सुरक्षाविषयक आणि तांत्रिक उणिवा दूर करून आवश्यक सर्व कायदेशीर दाखले लवकरात लवकर प्राप्त करण्याचे आदेश त्यांनी संबंधित विभागांना दिले.

बारामती ॲग्रोला प्रदूषण नियंत्रण मंडळाची नोटीस

सात दिवसांत खुलासा करा, अन्यथा कारवाईचा इशारा



बारामती, दि. ७ (वार्ताहर) : इंदापूर तालुक्यातील शेळफळगडे येथील आमदार रोहित पवार यांच्या बारामती ॲग्रो लिमिटेड साखर कारखान्याला पर्यावरणीय नियमांचे उल्लंघन केल्याप्रकरणी महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाने 'कारणे दाखवा' नोटीस बजावली आहे. सात दिवसांच्या आत लेखी खुलासा सादर करण्याचे निर्देश देत, समाधानकारक उत्तर न मिळाल्यास पाणी (प्रदूषण प्रतिबंध व नियंत्रण) अधिनियम, १९७४ आणि वायू (प्रदूषण प्रतिबंध व नियंत्रण) अधिनियम, १९८१ अंतर्गत कोणतीही पूर्वसूचना न देता कायदेशीर कारवाई करण्यात येईल, असा इशारा मंडळाने दिला आहे.

स्थानिक रहिवासी सागर संजय वाबळे आणि चांगण वाबळे यांनी केलेल्या तक्रारीनंतर तसेच भाजप युवा मोर्चाच्या पाठपुराव्यानंतर महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाच्या अधिकाऱ्यांनी ३ जुलै रोजी कारखान्याची प्रत्यक्ष पाहणी केली होती. या पाहणीत पर्यावरणीय नियमांचे अनेक उल्लंघन झाल्याचे निदर्शनास आल्याचे मंडळाने नमूद केले आहे.अहवालानुसार, सुमारे दोन एकरांच्या कच्च्या तलावात प्रक्रिया न केलेले काळपट औद्योगिक सांडपाणी साठविण्यात आले होते. या तलावातून सांडपाणी झिरपत सिंचन कालव्यात जात असल्याचे तसेच पाईपद्वारे थेट कालव्यात सोडले जात असल्याचे आढळले. तलावाचे अस्तर (लायनिंग) खराब झाल्याने भूजल आणि परिसरातील विहिरींना प्रदूषणाचा धोका निर्माण झाल्याचे निरीक्षण नोंदविण्यात आले आहे.

याशिवाय हायड्रोक्लोरिक ॲसिडची वैज्ञानिक पद्धतीने साठवणूक न केल्याने पर्यावरण आणि सुरक्षेच्या दृष्टीने गंभीर त्रुटी आढळल्याचेही मंडळाने स्पष्ट केले आहे. या सर्व बाबींचा खुलासा करण्यासाठी कारखान्याला सात दिवसांची मुदत देण्यात आली असून, आवश्यक सुधारणा न केल्यास कठोर कारवाई केली जाणार असल्याचे नोटिशीत नमूद करण्यात आले आहे. प्रदूषण नियंत्रण मंडळाचे पुणे विभागाचे प्रादेशिक अधिकारी बाळासाहेब महिपतराव कुकडे यांनी ६ जुलै रोजी ही नोटीस जारी केली आहे. निर्धारित मुदतीत समाधानकारक स्पष्टीकरण न मिळाल्यास संबंधित कायद्यांनुसार पुढील कारवाई करण्यात येईल, असे मंडळाने स्पष्ट केले आहे.

दरम्यान, या कारवाईचे भाजप युवा मोर्चा, पुणे ग्रामीणचे जिल्हाध्यक्ष वैभव सोलनकर यांनी स्वागत केले. पर्यावरणाचे नुकसान करणाऱ्या कोणालाही कायद्यापासून सूट मिळता कामा नये. नियमांचे उल्लंघन सुरूच राहिल्यास आणि दोषींवर कठोर कारवाई झाली नाही, तर जनतेला सोबत घेऊन व्यापक जनआंदोलन छेडले जाईल, असा इशाराही त्यांनी दिला. यावेळी जगदीश कोळेकर आणि संदीप केसकर उपस्थित होते.

नांदेड-मुंबई, नांदेड-टनकपूर एक्स्प्रेस सेवांचा शुभारंभ

मुंबई, दि. ७ (प्रतिनिधी) : मराठवाडा, विदर्भ आणि उत्तर भारतातील रेल्वे प्रवाशांसाठी महत्त्वपूर्ण ठरणाऱ्या नांदेड–लोकमान्य टिळक टर्मिनस (मुंबई) एक्स्प्रेस, नांदेड–टनकपूर एक्स्प्रेस आणि टनकपूर–पीलीभीत रेल्वे सेवेचा शहाजहानपूरपर्यंत विस्तार या सेवांचा शुभारंभ सोमवारी करण्यात आला. महाराष्ट्राचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उत्तराखंडचे मुख्यमंत्री पुष्कर सिंह धामी आणि केंद्रीय रेल्वेमंत्री अश्विनी वैष्णव यांनी व्हिडीओ कॉन्फरन्सिंगद्वारे या सेवांचे उद्घाटन केले.

हूजूर साहिब नांदेड रेल्वे स्थानकावर झालेल्या कार्यक्रमाला खासदार अशोकराव चव्हाण, डॉ. अजित गोपछडे, रवींद्र चव्हाण, बळवंत वानखेडे, महापौर कविता मुळे, विधान परिषद सदस्य अमरनाथ राजूरकर यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित होते. यावेळी रेल्वेमंत्री अश्विनी वैष्णव म्हणाले की, नांदेड हे शीख समाजाचे महत्त्वाचे धार्मिक केंद्र असून नव्या रेल्वे सेवांमुळे मुंबई, उत्तराखंड आणि उत्तर भारताशी थेट संपर्क अधिक मजबूत होणार आहे.

उद्घाटनानिमित्त गाडी क्रमांक ०७६६७ हूजूर साहिब नांदेड–लोकमान्य टिळक टर्मिनस विशेष एक्स्प्रेसला हिरवा झेंडा दाखवून रवाना करण्यात आले. या गाडीला पूर्णा, बसमत, हिंगोली डेक्कन, वाशिम, अकोला, मलकापूर, भुसावळ, चाळीसगाव, मनमाड, नाशिक रोड आणि कल्याण येथे थांबे देण्यात आले आहेत.रेल्वे प्रशासनाने जाहीर केलेल्या वेळापत्रकानुसार गाडी क्रमांक १७६६७ नांदेड–लोकमान्य टिळक टर्मिनस एक्स्प्रेस ८ जुलैपासून, १७६६८ लोकमान्य टिळक टर्मिनस–नांदेड एक्स्प्रेस ९ जुलैपासून, १७६६५ नांदेड–लोकमान्य टिळक टर्मिनस एक्स्प्रेस १३ जुलैपासून आणि १७६६६ लोकमान्य टिळक टर्मिनस–नांदेड एक्स्प्रेस १४ जुलैपासून नियमित धावणार आहेत. आठवड्यात दोन दिवस या गाड्यांची सेवा उपलब्ध राहणार असून कल्याण, नाशिक रोड, मनमाड, भुसावळ, मलकापूर, अकोला, वाशिम, हिंगोली डेक्कन, बसमत आणि पूर्णा हे प्रमुख थांबे असतील.गाडी क्रमांक १७६६६ आणि १७६६८साठी आरक्षण ८ जुलैपासून सर्व संगणकीकृत आरक्षण केंद्रांवर, आयआरसीटीसीच्या संकेतस्थळावर तसेच 'रेलवन' ॲपवर उपलब्ध होणार असल्याचे रेल्वे प्रशासनाने सांगितले.

मयूर हॉटेल–सेंट्रल हॉस्पिटल रस्त्यावर पाणी साचण्याची समस्या

उल्हासनगर, दि. ७ (वार्ताहर) : उल्हासनगर-३ येथील मयूर हॉटेल ते सेंट्रल हॉस्पिटल दरम्यान नुकत्याच बांधण्यात आलेल्या रस्त्याच्या दर्जाबाबत आणि नियोजनाबाबत पुन्हा प्रश्नचिन्ह उपस्थित झाले आहे. पावसाचे पाणी साचल्याने एका शाळकरी मुलाचा नाल्यात पडून वाहून जाण्याचा प्रसंग घडल्याचा आरोप महाराष्ट्र नवनिर्माण सेनेने केला असून, या घटनेमुळे परिसरात संताप व्यक्त होत आहे.

मनसेच्या पदाधिकाऱ्यांच्या म्हणण्यानुसार, उल्हासनगर महापालिकेने नव्याने रस्ता बांधताना पाण्याच्या निचऱ्याचे योग्य नियोजन केले नाही. तसेच, नाल्यालगतचा पदपथ अर्धवट अवस्थेत ठेवण्यात आल्याने नागरिकांच्या सुरक्षेचा प्रश्न निर्माण झाला आहे. याच त्रुटीमुळे पावसाच्या पाण्यात एक शाळकरी मुलगा नाल्यात पडल्याचा दावा करण्यात आला आहे. या मार्गावर सेवा सदन महाविद्यालय आणि शासकीय तंत्रविद्यालय असल्याने दररोज शेकडो विद्यार्थी तसेच नागरिकांची मोठी वर्दळ असते. मात्र, रस्त्याची रुंदी कमी करून पदपथ मोठे करण्यात आल्याने वाहतुकीवरही परिणाम होत असल्याचा आरोप करण्यात आला आहे.

मनसेने असा आरोप केला आहे की, रस्त्याची पातळी नाल्यापेक्षा खाली असल्यामुळे पावसाचे पाणी साचते आणि त्याचा निचरा होत नाही. त्यामुळे मुसळधार पावसात संपूर्ण रस्ता जलमय होत असून वाहनचालक आणि पादचाऱ्यांना मोठ्या अडचणींचा सामना करावा लागत आहे. या त्रुटींबाबत महाराष्ट्र नवनिर्माण सेनेने यापूर्वीही महापालिका आयुक्तांकडे वारंवार तक्रारी करून योग्य दुरुस्ती करण्याची मागणी केली होती. मात्र, प्रशासनाने त्याकडे दुर्लक्ष केल्याचा आरोप करण्यात आला आहे.

लोणावळा घाटातील दरडीनंतर रेल्वे सेवा विस्कळीत; १४ गाड्या रद्द

मुंबई, दि. ७ (प्रतिनिधी) : लोणावळा-कर्जत रेल्वे मार्गावरील ठाकूरवाडी आणि मंकी हिल केबिनदरम्यान ६ जुलै रोजी दरड कोसळल्यामुळे मध्य रेल्वेच्या वाहतुकीवर मोठा परिणाम झाला असून, मंगळवारी दुपारी १२ वाजेपर्यंतच्या अद्ययावत माहितीनुसार १४ रेल्वेगाड्या रद्द करण्यात आल्या आहेत. याशिवाय एक गाडी अंशतः रद्द, पाच गाड्या वळविण्यात आल्या असून, तीन गाड्या शॉर्ट टर्मिनेट आणि तीन गाड्या शॉर्ट ओरिजिनेट करण्यात आल्या आहेत. एका गाडीच्या वेळापत्रकातही बदल करण्यात आला आहे.

मध्य रेल्वेने दिलेल्या माहितीनुसार, ६ जुलै रोजीच्या प्रवासासाठी पुणे-भुज एक्सप्रेस रद्द करण्यात आली होती. तर ७ जुलै रोजी पुणे-सोलापूर इंटरसिटी, सोलापूर-पुणे इंटरसिटी, पुणे-छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस इंद्रायणी एक्सप्रेस, इंटरसिटी एक्सप्रेस, डेक्कन एक्सप्रेस, डेक्कन क्वीन, प्रगती एक्सप्रेस, सिंहगड एक्सप्रेस, छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस-धुळे एक्सप्रेस, धुळे-छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस एक्सप्रेस तसेच सातारा-दादर एक्सप्रेस अशा एकूण १३ गाड्या रद्द करण्यात आल्या आहेत. याशिवाय ८ जुलै रोजी सुटणारी भुज-पुणे एक्सप्रेसही रद्द करण्यात आली आहे. छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस-कोल्हापूर एक्सप्रेस ही गाडी छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस ते खडकीदरम्यान अंशतः रद्द करण्यात आली असून, ती खडकी येथून नियोजित वेळेनुसार पुढील प्रवास करणार आहे.

चेन्नई-छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस एक्सप्रेस, वेलंकन्नी-डहाणू रोड विशेष गाडी, नांदेड-पनवेल एक्सप्रेस, यशवंतपूर-बारमेर एक्सप्रेस आणि कोईम्बतूर-लोकमान्य टिळक टर्मिनस एक्सप्रेस या पाच गाड्या दौंड, मनमाड, इगतपुरी, कल्याण तसेच काही गाड्या जळगाव, पाळधी आणि सुरतमार्गे वळविण्यात आल्या आहेत.

हुबळी-दादर एक्सप्रेस, हैदराबाद-छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस एक्सप्रेस आणि सोलापूर-छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस वंदे भारत एक्सप्रेस या तीन गाड्या पुणे येथेच शॉर्ट टर्मिनेट करण्यात आल्या आहेत. तर दादर-हुबळी एक्सप्रेस, छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस-सिकंदराबाद एक्सप्रेस आणि छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस-सोलापूर वंदे भारत एक्सप्रेस या तीन गाड्या पुणे येथूनच शॉर्ट ओरिजिनेट करण्यात येत आहेत.

याशिवाय, छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस-नांदेड एक्सप्रेसच्या वेळापत्रकात बदल करण्यात आला असून, ही गाडी नियोजित दुपारी १.१५ ऐवजी दुपारी ३.१५ वाजता सुटणार आहे. मध्य रेल्वेने प्रवाशांना प्रवासापूर्वी संबंधित रेल्वेगाड्यांची अद्ययावत माहिती तपासूनच प्रवासाचे नियोजन करण्याचे आवाहन केले आहे. दरड हटविण्याचे आणि रेल्वे मार्ग पूर्ववत सुरू करण्याचे काम युद्धपातळीवर सुरू असल्याचे रेल्वे प्रशासनाने सांगितले आहे.

जाहीर नोटीस

याद्वारे कळविण्यात येते की कै. विकास साताप्पा माने, राहणार - जी २/७,कोकण शिल्प एस.आर.ए सोसायटी लि. कोकण नगर, जोगेश्वरी (पूर्व) मुंबई - ४०००६०, हे कार्यरत शासकीय कर्मचारी दिनांक २२/०५/२०२६ रोजी मयत झाले. मृत्यू पश्चात त्यांना पुढे नमूद केल्याप्रमाणे कायदेशीर वारस आहेत

१) रंजना विकास माने – वय ४४ – पत्नी
२) अनुज विकास माने – वय १७ – मुलगा

उक्त नमुद वारसांना उक्त नमूद मृत व्यक्ति पश्चात त्यांच्या निवृत्त वेतन/ बँक ठेवी/ प्रॉव्हीडंट फंड मिळण्याकरीता वारस दाखला हवा असल्याने तसा अर्ज तहसीलदार अंधेरी यांचेकडे केला आहे त्या अनुषंगाने कुणा व्यक्तीचा आक्षेप असल्यास त्यांनी तहसीलदार अंधेरी यांचे कार्यालय, दादा भाई नौरोजी रोड, अंधेरी (प) मुंबई ४०००५८ यांच्याकडे लेखी पुराव्यासह नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ७ दिवसात संपर्क साधावा, अन्यथा प्रकरणी आक्षेप नाही असे समजून निर्णय घेण्यात येईल.

अर्जदार
श्रीमती. रंजना विकास माने
राहणार: जी- ९, तळ मजला,
कोकण सम्राट एस.आर.ए सोसायटी लि.
शिवनेरी वसंत रोड, कोकण नगर,
जोगेश्वरी (पूर्व) मुंबई - ४०००६०

जाहीर नोटीस

याद्वारे कळविण्यात येते की माझे वडील कै. जकी हुस्सैन सैय्यद राहणार, मेहंदी हुसैन की चाळ, ईदगाह मैदान, प्रेम नगर, जोगेश्वरी (ईस्ट) मुंबई - ४०००६०.

कै. जकी हुस्सैन सैय्यद यांचे मेहंदी हुसैन की चाळ, ईदगाह मैदान, प्रेम नगर, जोगेश्वरी (ईस्ट) मुंबई - ४०००६० येथे दिनांक : १०/१२/२०१७ रोजी मयत झाले व त्यांचे भारत देशात कुठल्याही राज्य किंवा तालुक्यात सरकारी कार्यालयात मृत्यू नोंद करण्यात आली नाही. तसेच मी अंधेरी तहसीलदार कार्यालयात आणि बृहन्मुंबई महानगर पालिका वॉर्ड क्र. के/पूर्व कार्यालयात मृत्यु नोंदणीसाठी अर्ज केला आहे. त्या अनुषंगाने कुणा व्यक्तीचा आक्षेप असल्यास त्यांनी अंधेरी तहसिलदार दादाभाई नौरोजी रोड यांच्या कार्यालयात अंधेरी (प) मुंबई - ४०००५८ यांच्याकडे लेखी पुराव्यासह नोटीस प्रसिध्द झाल्यापासून ७ दिवसांच्या आत कार्यालयात उपस्थित राहावे.

अर्जदार
श्री. जाकीर हुस्सैन सैय्यद
राहणार : मेहंदी हुसैन की चाळ,
ईदगाह मैदान, प्रेम नगर, जोगेश्वरी (ईस्ट)
मुंबई - ४०००६०.

AUTHUM ऑथम इन्व्हेस्टमेंट अँड इन्फ्रास्ट्रक्चर लिमिटेड

नोंदणीकृत कार्यालय: ७०७, रहेजा सेंटर, फ्री प्रेस जर्नल रोड, नरिमन पॉइंट, मुंबई-२१.
दूरध्वनी: (०२२) ६७४७ २११७, **फॅक्स:** (०२२) ६७४७ २११८ **ई-मेल:** Info@authum.com

ताबा सूचना

सिक्युरिटी इंटरेस्ट (एनफोर्समेंट) रूल्स, २००२ च्या नियम ८(१) अन्वये

मी, निम्नस्वाक्षरीकार, ऑथम इन्व्हेस्टमेंट अँड इन्फ्रास्ट्रक्चर लिमिटेड ("एआयआयएल") चे प्राधिकृत अधिकारी (एनसीएलटी च्या १०.०५.२०२४ रोजीच्या आदेशानुसार रिलायन्स कमर्शियल फायनान्स लिमिटेड ("आरसीएफएल") कडून एआयआयएलकडे कर्ज देण्याचा व्यवसाय विलग झाल्यामुळे अस्तित्वात आलेली कंपनी, 'सिक्युरिटायझेशन अँड रिकन्स्ट्रक्शन ऑफ फायनान्शियल ॲसेट्स अँड एनफोर्समेंट ऑफ सिक्युरिटी इंटरेस्ट ॲक्ट, २००२' (सरफेसी कायदा) अंतर्गत आणि कलम १३(१२) व सिक्युरिटी इंटरेस्ट (एनफोर्समेंट) रूल्स, २००२ च्या नियम ३ अन्वये प्राप्त अधिकारांचा वापर करून, कर्जदार/सह-कर्जदार/ हमीदार/तारणकर्ते **- रजनीबाई कानूभाई हिरपरा, रीताबेन आर. हिरपरा, विराट सिल्क, व्हिजन एक्सपोर्ट अँड इम्पोर्ट** यांना **१९/११/२०१८ रोजी मागणी नोटीस** बजावली होती. या नोटिशीद्वारे त्यांना, नोटिशीत नमूद केलेली रक्कम **रु. १,७१,७३,०९०/- (एक कोटी एकाहत्तर लाख त्र्याहत्तर हजार नव्वद रुपये मात्र)** तसेच पुढील व्याज आणि खर्च, सदर नोटीस मिळाल्यापासून ६० दिवसांच्या आत परतफेड करण्यास सांगण्यात आले होते.

कर्जदार/सह-कर्जदार/हमीदार/तारणकर्ते यांनी सदर रकमेची परतफेड न केल्यामुळे, त्यांना आणि सर्वसाधारण जनतेला याद्वारे सूचित करण्यात येते की, मी, खाली सही करणाऱ्या अधिकाऱ्याने, कायद्याच्या कलम १३ च्या पोट-कलम (४) आणि सिक्युरिटी इंटरेस्ट (एनफोर्समेंट) रूल्स, २००२ च्या नियम ८ अन्वये प्राप्त अधिकारांचा वापर करून, खाली वर्णन केलेल्या मालमत्तेचा **ताबा २ जुलै २०२६** रोजी घेतला आहे.

तारण ठेवलेली मालमत्ता परत मिळवण्यासाठी उपलब्ध असलेल्या वेळेबाबत, कायद्याच्या कलम १३ च्या पोट-कलम (८) मधील तरतुदींकडे कर्जदार/सह-कर्जदार/हमीदार/तारणकर्ते यांचे लक्ष वेधले जात आहे.

याद्वारे कर्जदार/सह-कर्जदार आणि सर्वसाधारण जनतेला सूचित करण्यात येते की, त्यांनी सदर मालमत्तेबाबत कोणतेही व्यवहार करू नयेत; तसेच, या मालमत्तेबाबत केलेले कोणतेही व्यवहार हे **'ऑथम इन्व्हेस्टमेंट अँड इन्फ्रास्ट्रक्चर लिमिटेड' यांच्या १,७१,७३,०९०/- रुपये (अक्षरी एक कोटी एकाहत्तर लाख त्र्याहत्तर हजार नव्वद रुपये मात्र)** इतकी रक्कम आणि त्यावरील व्याज यांच्या बोजाखाली असतील.

अचल मालमत्तेचे वर्णन

दुकाने क्र. २० आणि २१, तळघर मजला, अटलांटिक प्लाझा, गॅरेज गल्ली, भवानी शंकर रोड, दादर (पश्चिम), मुंबई ४०००२८, महाराष्ट्र.

दिनांक: २/७/२०२६ — **प्राधिकृत अधिकारी**
स्थळ: मुंबई — **ऑथम इन्व्हेस्टमेंट अँड इन्फ्रास्ट्रक्चर लिमिटेड**

OMKARA ओमकारा ॲसेट्स रिकन्स्ट्रक्शन प्रायव्हेट लिमिटेड

कॉर्पोरेट कार्यालय: कोहिनूर स्क्वेअर, ४० वा मजला, एन. सी. केळकर मार्ग, आर. जी. गडकरी चौक, दादर (पश्चिम), मुंबई - ४०००२८.
मोबाईल: +९१ ९७६९१७०७७४ **बोर्ड:** +९१ २२ २६९२३३१११ **ई-मेल:** tanaji@omkaraarc.com | www.omkaraarc.com

स्थावर मालमत्तेच्या विक्रीसाठी ई-लिलावाकरिता सार्वजनिक सूचना
[परिशिष्ट - IV-एच] [नियम ८ (६) च्या तरतुदीनुसार]

सिक्युरिटायझेशन अँड रिकन्स्ट्रक्शन ऑफ फायनान्शियल असेट्स अँड एन्फोर्समेंट ऑफ सिक्युरिटी इंटरेस्ट ॲक्ट, २००२ ("सरफेसी ॲक्ट") अन्वये, सिक्युरिटी इंटरेस्ट (एन्फोर्समेंट) रूल्स, २००२ च्या नियम ८ (६) च्या तरतुदीसह, स्थावर मालमत्तेच्या विक्रीसाठी ई-लिलाव विक्री सूचना.

याद्वारे सर्वसामान्य जनतेला आणि विशेषतः खाली नमूद केलेल्या कर्जदार आणि जामीनदारांना सूचित करण्यात येते की, सुरक्षित धनकोकडे गहाण/प्रभारित असलेल्या आणि ज्याचा ताबा सुरक्षित धनकोच्या अधिकृत अधिकाऱ्याने घेतला आहे, अशा खाली वर्णन केलेल्या स्थावर मालमत्तांची विक्री **दिनांक १२.०८.२०२६ रोजी दुपारी ०१.०० वाजता** "जशी आहे तशी", "जे काही आहे ते", "जे काही उपलब्ध आहे" आणि कोणत्याही दाव्याशिवाय या तत्त्वावर केली जाईल. निविदा सादर करण्याची अंतिम तारीख आणि वेळ **११.०८.२०२६ सायंकाळी ६.०० वाजेपर्यंत** आहे, ओमकारा ॲसेट्स रिकन्स्ट्रक्शन प्रायव्हेट लिमिटेड, ओमकारा पीएस ०३/२०२५-२६ ट्र